**महाराष्ट्र शासन**

**उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११००१.**

# जाहिरात

## केंद्र शासन पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठीची मॅट्रिकोत्तर (Post Matric) शिष्यवृत्ती योजना सन २०१६-१७

राज्यातील **मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, पारशी व जैन** या अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी केंद्रशासनपुरस्कृत मॅट्रिकोत्तर (Post Matric) शिष्यवृत्ती योजना राज्यामध्ये सन २०१६-१७ साठी ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येत आहे. यासाठी विद्यार्थ्यांचे नविन शिष्यवृत्ती (Fresh) व शिष्यवृत्तीचे नूतनीकरण (Renewal) करण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांनी **www.scholarships.gov.in** या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरणे आवश्यक आहे. फक्त ऑनलाईन (Online) पद्धतीने भरलेले अर्जच स्विकारले जातील. कोणत्याही परिस्थीतीत ऑफलाईन (Offline) अर्ज स्विकारण्याची विनंती मान्य केली जाणार नाही. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ साठी केंद्र शासनाने नवीन शिष्यवृत्ती (Fresh) करिता ४८३०२ संच (Quota) निर्धारित केलेले असून त्यातील ३०% संच मुलींसाठी राखीव आहेत. नूतनीकरणासाठी संच निर्धारीत नसतात. सन २०१४-१५ पासून सदर शिष्यवृत्तीचा निधी १००% केंद्रशासनाकडून वितरीत करण्यात येतो.

❖ **किमान पात्रता व अटी :**

१) अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
२) विद्यार्थी मागील वार्षिक परीक्षेत किमान ५०% गुण घेऊन उत्तीर्ण झालेला असावा
३) अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा / स्टायपेंड योजनेचा लाभार्थी नसावा.
४) नुतनीकरणासाठी विद्यार्थ्याने पुढील वर्गात प्रवेश घेतलेला असावा.
५) अर्जदाराच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. २.०० लाख च्या वर नसावी.
६) एका कुटूंबातील फक्त दोन अपत्यांनाच सदर योजनेचा लाभ घेता येईल.
७) एखाद्या विद्यार्थ्याने चुकीच्या माहितीच्या आधारे किंवा अटींचे उल्लंघन करुन शिष्यवृत्ती मिळवली असेल तर त्याची शिष्यवृत्ती रद्द केली जाईल / वसूल केली जाईल.
८) विद्यार्थ्यांनी आधार कार्ड सादर करणे अनिवार्य राहील.
९) विद्यार्थ्याने कोणत्याही राष्ट्रीयीकृत (Nationalise) बँकेत स्वत:चे खाते उघडणे आवश्यक आहे. तसेच हे खाते आधार कार्डशी संलग्न (link) करणे आवश्यक आहे.

❖ **अर्ज करण्याची पद्धत (नविन मंजुरी/नूतनीकरण):**

१) अल्पसंख्यांक पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती या योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी **www.scholarships.gov.in** या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरणे आवश्यक आहे.
२) ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी उपरोक्त संकेतस्थळाच्या homepage वरील Frequently Asked Questions (FAQs) वाचून व समजून घेऊनच ऑनलाईन अर्ज भरावा.

३) ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचण निर्माण झाल्यास आपल्या महाविद्यालय / संस्थेशी संपर्क साधुन सदर अर्ज महाविद्यालयाच्या/ संस्थेच्या मदतीने पूर्ण करुन घ्यावा. सदर शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी आपला अर्ज ऑनलाईन सिस्टीममध्ये येणे अनिवार्य आहे.

❖ **अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती सन २०१६-१७ करिता नवीन शिष्यवृत्ती (Fresh) व नुतनीकरण (Renewal) अर्ज सादर करण्यासाठी भारत सरकारने घोषित केलेले वेळापत्रक**

| क्र. | कार्यसूची | अंतिम दिनांक | |
|---|---|---|---|
| | | नवीन शिष्यवृत्ती (Fresh) | नुतनीकरण (Renewal) |
| १ | इयत्ता ११वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक. | ३१ ऑगस्ट २०१६ पर्यंत | |
| २ | आय.टी.आय., डिप्लोमा, बी.एड्, एम.फिल, पीएच.डी., पदवी, पदव्युत्तर यासारखे उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक. | ३१ ऑक्टोबर २०१६ पर्यंत | |

विद्यार्थ्यांनी व महाविद्यालयांनी अधिक माहितीसाठी तसेच याबाबतच्या नविन प्राप्त होणाऱ्या सूचनांसाठी **www.scholarships.gov.in** व **www.dhepune.gov.in** या संकेतस्थळाचे अवलोकन करावे. सदरचे संकेतस्थळ हे **www.minorityaffairs.gov.in** व **www.dhepune.gov.in** या संकेतस्थळाशी देखिल जोडलेले (Link) आहे. तसेच संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाशी किंवा उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ येथील दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२६९३९ वर अधिक माहितीसाठी संपर्क साधावा.

(डॉ. धनराज माने )
संचालक तथा नोडल ऑफिसर
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.